# कार्यालय नगर परिषद भद्रावती
## जिल्हा – चंद्रपुर

Tel. No – 07175-२६६६६२ (OFFICE)
07175-266025 (PRESIDENTI)

Fax No – 07175-265008
E Mail – mcbhadrawati@gmail.com
Web – www.bhadrawatimc.org


२०

### अटी व शर्ती

| अ. क्र | कामाचे नांव | अनामत रक्कम | निविदा प्रपत्र किंमत |
|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा विभागाकरीता १२५ एच पी व्हीटी पंप, १५ एच पी मोनोब्लॉक पंप, तसेच ५,१०,१५ एच.पी समर्शिबल पंप दुरूस्त करणे व फिटींग करून देणे तसेच सर्व विद्युत पॅनल संबधित कामे करणे. | १००००/– | २०००/– |
| २ | पाणी पुरवठा विभागाकरीता बंद असलेले हातपंप काढणे, दुरूस्ती करणे व फिटींग करूण देणे तसेच आवश्यकत्तेनुसार हातपंपाचे प्लॉशिंग व ओटे बांधकाम करणे. Hand Repairing. | १००००/– | २०००/– |
| ३ | पाणी पुरवठा विभागाकरीता नळ योजना, हातपंपाला लागणारे साहित्य पुरवठा करणेबाबत. (आवश्यकतेनुसार). Hardware. | १००००/– | २०००/– |
| ४ | पाणी पुवठा विभागाकरीता ब्लिचिंग पावडर, मेडिक्लोर, ॲलम (तुरटी ग्रेड –२), गेअर ऑईल, क्लोरीन गॅसचा पुरवठा करणेबाबत (आवश्यकत्तेनुसार). | १००००/– | २०००/– |
| ५ | पाणी पुरवठा विभागातील आवश्यकत्तेनुसार किरकोळ कामे करण्याकरीता फुटकळ ऐजन्सी नियुक्त करण्याबाबत. | १००००/– | २०००/– |
| ६ | पाणी पुरवठा विभागाकरीता शहरातील सर्व प्रकारच्या पाईपलाईन वरील आवश्यकतेनुसार लिकेज दुरूस्ती व व्हॉल फिटींग करून देणे. | १००००/– | २०००/– |

### ई – निविदा प्रसिध्दीचा तपशील

| | |
|---|---|
| ई निविदा प्रसिध्दी दिनांक | दिनांक ३१/०३/२०२६ स. ११.०० वाजता |
| ई निविदा दाखल व स्विकृती दिनांक | दिनांक ३१/०३/२०२६ ते दिनांक १०/०४/२०२६ सायंकाळी ०६.०० वाजता |
| ई निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १३/०४/२०२६ दुपारी. १२.०० वाजता |

अटी व शर्ती :–

१. निविदेची सुचना, अटी व शर्ती पुढील सर्व कार्यवाही व शुदधीपत्रके महाराष्ट्र शासनाच्या **http://mahatenders.gov.in** या वेबसाईटवर पाहावयास मिळेल.

२. कोणतेही कारण न देता एक अथवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार मा.मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवलेला आहे, या बाबत वेगळी कारणे दिली जाणार नाही.

३. नोंदणीकृत कंत्राटदारानी अधिकृत डिएससी प्राप्त करून घेउन महाराष्ट्र शासनाच्या **http://mahatenders.gov.in** वेबसाईटवर स्वत:नोंदणी करून केवळ ई –निविदा पध्दतीनेच आपली निविदा सादर करावी. अनामत रक्कम व निविदा विक्रिची किंमत फक्त Online Payment ने स्विकारले जाईल.

४. निधीच्या उपलब्धतेनुसार देयक शोधन करण्यात येईल व या कालावधीत कंत्राटदाराला आगाउ देयकाची मागणी करता येणार नाही. कामाचे बिलातुन वेळोवेळी नियमानुसार सर्व प्रकारचे कराची कपाती करण्यात येईल.

५. सदर उपरोक्त कामे करतांना कंत्राटदाराला लागणारे आवश्यक साहित्य, सुरक्षात्मक फलक, SAFETY ARRANGEMENTS उपाययोजना स्वत करावीत, न.प.भद्रावती व्दारे ती उपलब्ध करून मिळणार नाही.

६. जर संबधित कामे करतांना काही जिवीत व वित्तीय हानी झाल्यास सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहिल, न.प.भद्रावती जबाबदार राहणार नाही यांची नोंद घ्यावी.

७. उपरोक्त निविदा भरणेकरीता किंवा कोणत्याही कारणाने कंत्राटदाराला ई –निविदा भरणेकरीता अपयश आल्यास किंवा इतर तांत्रिक समस्या उदभवल्यास त्यास न.प.भद्रावती जबाबदार राहणार नाही.

८. कंत्राटदारांनी उपरोक्त निविदा भरणेकरीता आवश्यक असलेली अटी व शर्ती शासनाचे **http://mahatenders.gov.in** वेबसाईटवर उपलब्ध असुन ई –निविदा भरणेकरीता आवश्यक सर्व प्रक्रियेचा अभ्यास करावा.

९. विविध कामगार कायदयाविषयक तरतुदीचे पालन करण्यात यावे. कामगारांची कोणतीही तक्रार आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१०. दि. १७ जुलै २०१७ पासुन देण्यात येणाऱ्या विविध शासकिय कंत्राटावर GST अधिनियमानुसार कराची आकारणी होणार आहे, त्यामुळे झालेल्या GST च्या कराचा बोजाचा विचार करून व सर्व कराचा समावेश करून निविदा दर सादर करावा.

११. निविदा प्रक्रियेमध्ये प्राप्त कमी दराच्या निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा दहा टक्यापेक्षा अधिक दराने कमी असेल तर संबंधित निविधारकाने एवढया कमी दरात काम करण्याच्या नियोजनाबाबत सविस्तर तपशिल मुख्याधिकारी यांना देणे बंधनकारक आहे.

१२. भरावयाचे कमी दराच्या निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किमती पेक्षा १०% पर्यंत कमी दराचा असेल अशा निविदाधारकांनी निविदाधीन किमतीचा १% एवढया रक्कम कॅश स्वरूपात परफार्मन्स सिक्युरिटी म्हणुन बंद लिफाफया सोबत स्कॅन कॉपी (PDF) स्वरूपात अपलोड करावी (उदा. १४% कमी दर असल्यास – १०% पर्यंत करीता १% व (१४% - १०%)= ४%) असे एकुण ५% निविदा स्वीकृतीपत्र प्राप्त झाल्यानंतर कॅश रक्कम १० दिवसाच्या आत कार्यालयात सादर करावे.

१३. सविस्तर माहिती करीता शासन निर्णय कं. बिडिजी २०१६/प्र.क्रं २/इमा २ १२.०२.२०१६ व बिडिजी २०१६/प्र.क्रं दिनांक ०१.०४.२०१७ चे अवलोकण करावे.

१४.पुरवठा धारकाने नामांकीत कंपनीचे साहीत्य पुरवठा करावे व त्याबाबत दर्जाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

१५.कंत्राटदारास/पुरवठा धारकास निविदा स्विकृत झाल्याचे पत्र प्राप्त झालेपासुन ७ (सात) दिवसाच्या आत नगरपरिषदेशी करारनामा करावा लागेल अन्यथा निविदा अस्विकृत करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याकडे राहतील.

१६.उपरोक्त कामाला नगरपरीषद अधिनियम कायदयातील सर्व तरतुदी मंजुर निविदा धारकास बंधनकारक राहिल.

१७.ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या निविदा दिनांक / /२०२६ ला शक्य झाल्यास **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळवर उपस्थित मतेदार अथवा त्यांनी प्रधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत उघडण्यात येईल.

१८.सदर कंत्राट बाबत केव्हाही व कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास अशा वादामध्ये नगर परिषदेचा निर्णय अंतिम राहिल व तो कंत्राटदारास बंधनकारक राहिल.

१९.निविदा मंजुरीनंतर सादर केलेल्या दरात कोणत्याही प्रकारची दरवाढ **(PRICE ESCALATION)** पुर्ण निविदा कालावधीमध्ये देय राहणार नाही. मंजुर झालेले निविदेतील दरातच काम करणे बंधनकारक राहील.

२०.कामाच्या स्वरूपानुसार आवश्यकतेनुसार लेखी कार्यादेश दिल्यानंतर ०७ दिवसांचे आत कामास सुरवात/साहित्य पुरवठा करणे कंत्राटदारास बंधनकारक असेल.

२१.काम क्रमांक ०१,०२,०५,०६ करीता निविदा धारकांनी खालिलप्रमाणे कागदपत्रे निविदेसोबत ऑनलाईन करणे तसेच सर्व दस्तावेजांची स्कॅन प्रत **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर वर अपलोड करणे बंधनकारक राहील.

- **a.** आयकर प्रमाणपत्र
- **b.** पॅनकार्ड
- **c.** नगरसेवक सोबत हितसंबध नसल्याबाबतचे शपथपत्र
- **d.** जिएसटी प्रमाणपत्र
- **e.** नोंदणी प्रमाणपत्र (MJP/ IRRIGATION)
- **f.** सदर कामाबाबतचे अनुभव प्रमाणपत्र
- **g.** ऑनलाईन पैसे भरल्याची पावती
- **h.** EPF प्रमाणपत्र

२२.काम क्रमांक ०३,०४, करीता निविदा धारकांनी खालिलप्रमाणे कागदपत्रे निविदेसोबत ऑनलाईन करणे तसेच सर्व दस्तावेजांनी स्कॅन प्रत **http://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर वर अपलोड करणे बंधनकारक राहील. तसेच सदर कामाकरीता स्थानिक कंत्राटदार यांना प्राधान्य राहिल.

- **a.** पॅनकार्ड
- **b.** नगरसेवक सोबत हितसंबध नसल्याबाबतचे शपथपत्र
- **c.** जिएसटी प्रमाणपत्र
- **d.** ऑनलाईन पैसे भरल्याची पावती
- **e.** आयकर प्रमाणपत्र

f. सदर पुरवठाबाबतचा अनुभव (२ ते ३ वर्ष)

g. नोंदणी प्रमाणपत्र (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना १९४८ नोंदणी कागदपत्रे)(शॉप अॅक्ट)

२३.नगर परीषद अधिनियम कायद्यातील तसेच स्थायी निर्देश ३६ मधील सर्व तरतुदी कंत्राटदारास बंधनकार राहतील.

२४.कंत्राटदार जर निष्काळजीपणा किंवा फसवणुक करीत असल्याचे निर्दशनास आल्यास कामाचा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्याधिकारी यांना राहील.

२५.कंत्राट रद्द झाल्यामुळे किंवा ईतर कोणत्याही कारणाने नगरपरिषदेच्या होणाऱ्या नुकसान भरपाईची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२६.कंत्राट रद्द झाल्याने कंत्राटदाराच्या होणाऱ्या कुठल्याही नुकसानभरपाई करीता न.प.कडे दावा सादर करता येणार नाही व असा दावा सादर करता येणार नाही व असा दावा सादर केल्यास त्यास विचारात घेतले जाणार नाही.

२७.कंत्राटदारास वेळोवेळी लेखी आदेशाव्दारे सोपविण्यात येणारे विभागाचे काम नाकारण्याचा अधिकार नसेल.

२८.सदर निविदेतील सर्व निविदेची मुदत कार्यारंभ आदेशापासुन पुढील १ वर्षा पर्यत वैध राहिल. तसेच मुदतवाढीकरीता न.प.सभेचे मंजुरीस अधिन आवश्यकतेनुसार स्वतंत्र आदेश देण्यात येईल.

२९.लेखापरिक्षणात आक्षेप आल्यास त्याची पुर्तता ०७ दिवसांच्या आत करणे बंधनकारक राहिल.

३०.नव्याने अट टाकणे/अट शिथिल/अट रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना राहिल.

३१.दिलेल्या मुदतित सदर कामास सुरवात/साहित्य पुरवठा न झाल्यास अशावेळी मुख्याधिकारी, नगर परिषद, भद्रावती यांचेकडे विलंबाबाबत कारणे नमुद करून अर्ज करावा लागेल. कारणे उचित नसल्यास उचित दंड किंवा रू. ५००/- आकारण्याचे पुर्ण अधिकार असतील.

३२.निविदा धारकांना ऑनलाईन निविदा भरताना संगणकामध्ये काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास नगर परीषद जबाबदार राहणार नाही.

मुख्याधिकारी
नगर परिषद भद्रावती.

# कार्यालय नगर परिषद भद्रावती, जिल्हा चंद्रपुर

## ई – निविदा सुचना (प्रथम वेळ)

मुख्याधिकारी, नगर परिषद भद्रावती यांचे वतीने योग्य त्या वर्गवारीतील नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडुन न.प. निधी अंतर्गत पा.पु विभागा करीता ६ कामाच्या ई–निविदा प्रणालीव्दारे दिनांक ३१/०३/२०२६ स ११.०० वाजता ते १०/०४/२०२६ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत (ऑनलाईन) मागवित आहे. ई–निविदा प्रणालीच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सविस्तर तपशिल उपलब्ध आहे.

मुख्याधिकारी
नगर परिषद भद्रावती.

---

क्रमांक/नपभ/पापु/२०२६/ १२८१
दिनांक :– ३०/०३/२०२६

प्रति,

श्री. सुनिल पत्तरेंगे संपादक / वार्ताहर

उपरोक्त प्रमाणे जाहिरात आपण आपले लोकप्रिय दैनिक ––––सकाळ–––––– दिनांक ३१/०३/२०२६ च्या अंकात कमीत कमी जागेत शासकिय दराने प्रसिध्द करावी व प्रसिध्दी अंकाच्या ०५ प्रतीसह बिल कार्यालयास सादर करावे.

मुख्याधिकारी,
नगर परिषद भद्रावती.

Signature Not Verified
Digitally signed by VISHAKHA PRAKASHRAO SHELKI
Date: 2026.03.30 18:22:24 IST
Location: Maharashtra-MH